# श्री विठ्ठलाचा पोवाडा

## श्री तुकाविप्र कृत

ऐका श्रोते, भाविकभोळे, सांगेण अंतरखुणा
तुम्ही विठ्ठल रखुमाई म्हणा ||धृ||
याच विचारे तरला तुका वैकुंठासी गेला ,

जड देह वरुता नेंला, अनुभवरत्न अभंगा वदला,
तरण उपाय भला, जडजीव उद्धार केला, कीर्तन कीर्ती मंगळा,
तुकीता तुका आला, हरिभजनी देवच झाला |
याज साठी आवडी गावें | अखंड देवाजीला | भेंटावे सजन्नाला |
पाहताचीं डोळा, साधू भोळा घालावे लोटांगणा ||१||

नामयाची जनीं, वदली नाम वाचें हरी,
तिचे देव काम करी, शेणपाणी धुणें धुतले झाडलोट करी,
केराची पाटीं भरीं, घेउनि शिरी टाकी दुरी,
भक्ताचा कैवारी, महाराज दिनोद्धारी,
ठेऊनि पाणी, न्हाऊ घातली भाग्याची सुंदरीं |
तिचे केस हरी विंचारी |
म्हणउनी भावे, आवडी गावे, गोपीका रमणा ||२||

विठ्ठल भजनीं कीर्ती जाहली, आळंदी ज्ञानेश्वरा,
त्याची भिंत चाले झराझरा, रेडयामुखी वेद घोकिले,
वदविले ओंकारा, पावले जैजैकारा.पैठणासी गेले जेंव्हा
शुद्धीच्या वेव्हारा |
अशा रीती बोधल्याची, पोवे भरी अंबारा, वैकुंठी वाजे नगारा,
कीर्तन वेळा पाठी सावळा, वाजवी टाळविणा ||३||
चोखा मेळा, त्याचे ढोरे ओढी दयाळा, एकनाथ घरी
वाहिले पाणी या विठ्ठले, श्रीखंड उगाळिले,
बारा वरुषे सेवा केली, पैठणी सोज्वळा, पितर जेवविले,
स्वर्गीचे आणुनी जेऊ घातिले,
कीर्तिचा कल्लोळा
थकित ब्राह्मण जाले
अघटित करणी, सारंग पाणी, कबीराचा तुणी ताणा ||४||

समारणामुळे, दामाजीचा विठो पाडींवार
देव जालासे चाकर, रसीद धेउनि बेदरा
गेला, कीर्ति केली थोर, या रूक्मीणीच्या वरे भक्तिकाजा,
सांडूनि लाजा, विठो जाहालासे महार, हरिदेव कटीकर
दींन हे बंधु ब्रीद पायी शोभले सुंदर, गोऱ्याचे उठविले पोर,
मीराचे विष पींऊनि, पियुष पाजी अमृत पान्हा ||५||

हरि चौपाठी, भव भक्ताची, कीर्ति जाहली कली
वेदांत श्रुति हाकली, तरले पापी नामस्मरणें,
पुराणें गर्जिन्नलीं, सा आठरा बेबादली, आत्मनंदे
ब्रह्यानंद, अखंड नित्यावळी, हरिकथेची धुमाळी,
विप्र तुका, हरि नामस्मरणीं वाणी रंगुनि गेली,
भजना हे रुची, कृपा गुरुची, अभंग पंढरी रमणा ||६||

ऐका श्रोते भाविक भोळे, सांगेन आंतर खुणा |
तुम्ही विठ्ठल रखुमाई म्हणा ........... |